सहकारातूनसमृध्दीकडे

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

५-बी.जे.रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

संकेतस्थळ: https://sahakarayukta.maharashtra.gov.in

---

# प्रसिध्दीपत्रक

सहकार विभागातील गट- क संवर्गातील उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक या पदांची सरळसेवेची रिक्त पदे भरण्याकरिता दि.०६/०७/२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरून विहीत मुदतीत अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची टी.सी.एस.आय.ओ.एन या कंपनीमार्फत दिनांक १६/०८/२०२३ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आलेली होती.

तरी सहकार विभागातील **उच्चश्रेणी लघुलेखक,निम्नश्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक** या पदांसाठी परीक्षा दिलेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांना परीक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त आहेत अशा उमेदवारांची **तात्पुरती गुणवत्ता यादी** सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि.१०/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

व्यावसायिक चाचणीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी दि.२१/०९/२०२४ व दि.२२/०९/२०२४ रोजी घेण्यात येणार असून याअनुषंगाने खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. उमेदवारांना दिलेल्या नियोजित वेळेमध्ये लघुलेखन व टंकलेखन या दोन्हीची व्यावसायिक चाचणी होणार असून लघुलेखनाच्या चाचणी नंतर नियोजित वेळेमध्ये लगेच टंकलेखनाची स्वतंत्र चाचणी होणार आहे.

२. उमेदवारांना प्रवेशपत्र निर्गमित करण्यात आलेले असून उमेदवारांकडून परीक्षा केंद्र व परीक्षेचा दिनांक यामध्ये बदल होणेबाबत या कार्यालयास व अधिनस्त कार्यालयांस ई-मेल व्दारे विनंती केलेली आहे. तथापि, परीक्षा केंद्रांमध्ये व दिनांकामध्ये कोणताही बदल होणार नसल्याची नोंद उमेदवारांनी घ्यावी आणि प्रवेशपत्रात नमुद परीक्षा केंद्रावर विहीत वेळेमध्ये उपस्थित रहावे.

३. उमेदवारांना सुचित करण्यात येते की, परीक्षा ही नियोजितप्रमाणे ऑनलाईन पध्दतीनेच घेण्यात येणार असून ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येणार नाही.

४. उमेदवारांनी ज्या विभागामधून परीक्षेसाठी अर्ज भरला आहे त्याच विभागामध्ये उमेदवारांना परीक्षा केंद्र देण्यात आलेले आहे तसेच ज्या उमेदवारांनी एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज भरला आहे, अशा उमेदवारांचे परीक्षा केंद्र हे पुणे येथे ठेवण्यात आलेले आहे. त्यानुसार ज्या उमेदवारांना प्रवेशपत्र प्राप्त झालेले नाही त्या उमेदवारांनी संबंधित विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांचेशी संपर्क साधावा.

५. परीक्षा केंद्रावर बायोमेट्रिक व्यवस्था / समक्ष तपासणी होणार असल्याने उमेदवाराने त्याच्या परीक्षा प्रवेशपत्रावर नमुद केल्याप्रमाणे परीक्षेच्या वेळेच्या १ तास ३० मिनिटे पुर्वी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. उशिरा येणाऱ्या उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही.

तसेच, उमेदवारांनी परीक्षा प्रवेशपत्रात नमुद केलेल्या सुचनांचे तसेच या कार्यालयामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**स्वाक्षरी/-**
**उपनिबंधक (आस्थापना),**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

दि. १९/०९/२०२४